RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ९, अंक २७] मंगळवार, एप्रिल १८, २०२३/चैत्र २८, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक ४४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ एप्रिल, २०२३.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक भनिनि. ११२३/६६/प्र.क्र.१८/का.१३-अ.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ यांच्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि त्या अनुषंगाने सक्षम असलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :—

१. (१) या नियमांना, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी (सुधारणा) नियम, २०२३ असे संबोधण्यात यावे.

(२) हे नियम त्यांच्या **शासकीय राजपत्रातील** प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ (यात यापुढे ज्यांचा निर्देश 'मुख्य नियम' असा करण्यात आला आहे) याच्या नियम ७ च्या उप नियम (१) मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे :—

"परंतु, मासिक वर्गणीची रक्कम व त्या वित्तीय वर्षात जमा होणारी थकबाकीची रक्कम ही नियम ८ च्या उप नियम (१) खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नसावी."

३. मुख्य नियमाच्या नियम ८ मध्ये,—

(१) उप नियम (१), खंड (ब) च्या परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे :—

"परंतु, आणखी असे की, वित्तीय वर्षातील नियमित वर्गणी व थकबाकी मिळून येणारी रक्कम आयकर नियमावली, १९६२ च्या नियम ९(घ), उप नियम (२) च्या खाली दिलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड (ग) च्या उप खंड (i) मध्ये दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल."

(२) उप-नियम (४) मध्ये,—

(अ) पहिले परंतुक वगळण्यात यावे.

(ब) द्वितीय परंतुकातील "आणखी असे की," या शब्दाऐवजी "परंतु" या शब्दाचा समावेश करावा.

(क) उप नियम (४) च्या नंतर, खालील उप नियम समाविष्ट करण्यात येत आहे :—

"(५) उप नियम (३) अंतर्गत निश्चित केलेली किंवा उप नियम (४) अंतर्गत कमी किंवा वाढविलेली वर्गणीची रक्कम उप नियम(१) मध्ये विर्निदिष्ट केलेल्या किमान आणि कमाल मर्यादेच्या अधिन असेल."

४. मुख्य नियमांच्या नियम ११ मध्ये, उप नियम (३),विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे :—

"परंतु, आणखी असे की, एका वित्तीय वर्षातील मासिक वर्गणी व थकबाकीसह मिळून येणारी रक्कम आणि त्या वित्तीय वर्षात वसूल केलेले व्याज, ही रक्कम नियम ८च्या उप नियम (१),खंड (ब) च्या दुसऱ्या परंतुकात नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक राहणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नितीन गद्रे,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## GENERAL ADMINISTRATIVE DEPARTMENT

Mantralay, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 18th April, 2023.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. GPF. 1123/66/C.R.No.18/Desk-13A.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and of all other powers enabling in this behalf, the Governor of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra General Provident Fund Rules, 1998, namely :—

**1.** (*1*) These rules may be called the Maharashtra General Provident Fund (Amendment) Rules, 2023.

(*2*) These rules shall come into force on the date of its publication in the *Official Gazette*.

**2.** In rule 7 of the Maharashtra General Provident Fund Rules, 1998, (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule (*1*), after the second proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided also that, the sum of the monthly subscriptions during a financial year together with the amount of arrear subscriptions deposited in that financial year shall not exceed the limit as specified in the second proviso to clause (b) of sub-rule (*1*) of rule 8.".

**3.** In rule 8 of the principal Rules,—

(*1*) in sub-rule (*1*), in clause (b), after the existing proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided further that, the sum of monthly subscriptions in a financial year shall not exceed the threshold limit referred to in sub-clause (*i*) of clause (c) of the Explanation below sub-rule (*2*) of rule 9D of the Income Tax Rules, 1962.";

(2) in sub-rule (*4*),—

(*a*) The first proviso shall be deleted ;

(*b*) In the second proviso, the word "further" shall be deleted ;

(*c*) after sub-rule (*4*), the following sub-rule shall be added, namely :—

"(5) The amount of subscription fixed under sub-rule (*3*) or reduced or enhanced under sub-rule (*4*) shall be subject to the minimum and maximum limits specified in sub-rule (*1*).".

**4.** In rule 11 of the principal Rules, in sub-rule (*3*), after the existing proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided further that, the sum of the monthly subscriptions during a financial year together with arrears of subscriptions and the interest thereon recovered in that financial year shall, in no case, exceed the limit as specified in the second proviso to clause (b) of sub-rule (*1*) of rule 8.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NITIN GADRE,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.